**पुणे महानगरपालिका.**

जाहिरात प्रकटन,

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील विविध गटातील उमेदवारांची खालील पदासाठी निवडयादी तयार करणेकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभव धारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ क्र | पदनाम | वेतन श्रेणी रुपये | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उप मुख्य लेखापाल (वर्ग-अ) | रु.१०००० ते २०२५० + मान्य भत्ते | सी.ए. किंवा आय.सी.डब्ल्यु.ए. किंवा सी.एस, संगणकाचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक. | १ (निवडयादी) | अनुसूचित जाती | **मुख्य लेखापाल कार्या** | |
| २ | प्राप्ती व चाचणीचे अर्थान्विक्षक (वर्ग-अ) | रु.१०००० ते २०२५० + मान्य भत्ते | सी.ए. किंवा आय.सी.डब्ल्यु.ए. किंवा सी.एस, संगणकाचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक. | १ (निवडयादी) | सर्वसाधारण | **मुख्य लेखापाल कार्यालय** | |
| ३ | ज्युनिअर लिगल असिस्टंट (वर्ग-अ) | रु.१०००० ते २०२५० + मान्य भत्ते | कायद्याचा पदवीधर आणि किमान ७ वर्षांचा लिगल प्रॅक्टीसचा अनुभव, ॲडव्होकेटची सनद घेतली असणे आवश्यक आहे. | १ (निवडयादी) | अनुसूचित जमाती | **विधी सल्लागार** | |
| ४ | क्षेत्रिय अधिकारी (वर्ग-अ) | रु.८००० ते १३५०० + मान्य भत्ते | अ) इंजिनिअरींगमधील पदवीधर :- बी.ई.(सिव्हील) अथवा कोणत्याही शाखेचा पदवी किंवा पदविकाधारक असावा व कनिष्ठ अभियंता व त्यावरील पदाच्या कामाचा किमान १० वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>ब) इंजिनिअरींगमधील पदवीकाधारक :- डी.सी.ई./डी.ई.ई. या कनिष्ठ अभियंता व त्यावरील पदाच्या कामाचा किमान १० वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क) एम.बी.बी.एस वैद्यकिय क्षेत्रातील उमेदवाराचा क्षेत्रिय अधिकारी या पदाकरीता विचार करण्यात येणार नाही.<br>ड) इतर शाखांचे पदविधर सिनिअर ग्रेड लेखनिक अगर वरिष्ठ संवर्गातील किमान १० वर्षांचा कामाचा अनुभव आवश्यक या शिवाय मनपा व संलग्न संस्थामधील पदव्युत्तर (पोस्ट ग्रॅज्युएट) शैक्षणिक पात्रताधारक सेवकांनी त्यांनी पदव्युत्तर पदवी धारण केलेल्या दिनांकापासूनचा कालावधी हा त्यांच्या १० वर्षाच्या अनुभवासाठी ग्राह्य धरणेत येईल. | १ (निवडयादी) | इमाव | - | |
| ५ | राजशिष्टाचार अधिकारी (प्रोटोकॉल ऑफिसर) (वर्ग-ब ) | रु.६५०० ते १०५०० + मान्य भत्ते | १) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पत्रकारीता शाखेतील पदवीका अगर पदवी असल्यास प्राधान्य<br>३) संगणकावरील कामाचा अनुभव आवश्यक तसेच एम.एस.सी.आय.टी.परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>४) मराठी,हिंदी इंग्रजी भाषेच्या ज्ञानासह या भाषा अस्खलीत बोलता व लिहिता येणे व पत्रव्यवहार करता येणे आवश्यक आहे.<br>५) स्थानिक स्वराज्य संस्था,शासनाच्या सेवेतील राजशिष्टाचार (प्रोटोकॉल) विषयक कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | १ (निवडयादी) | सर्वसाधारण | **नगर सचिव कार्यालय** | |
| ६ | लघुलेखक (वर्ग-क) | ५५०० ते १२८५० + मान्य भत्ते | १) एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण,<br>२) शासनाची मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. परिक्षा उत्तीर्ण,<br>३) शासनाची मराठी लघुलेखन १०० श.प्र.मि. परिक्षा उत्तीर्ण. | १ (निवडयादी) | सर्वसाधारण | **नगर सचिव कार्यालय** | |
| ७ | सॅनिटरी इन्स्पेक्टर (वर्ग-क) | रु.४५०० ते ७००० + मान्य भत्ते | १) एस.एस.सी.उत्तीर्ण<br>२) सॅनिटरी इन्स्पेक्टर कोर्स उत्तीर्ण. | १ (प्रतिक्षायादी) १ (निवडयादी) | विजा (अ) | **आरोग्य कार्यालय** | |

| अ क्र | पदनाम | वेतन श्रेणी रुपये | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | इलेक्ट्रीशियन (वर्ग-क) | रु.४००० ते ६६९५ + मान्य भत्ते | १) पी.डब्ल्यू.डी.वायरमन परिक्षा प्रथम वर्गात उत्तीर्ण<br>२) विद्युत पर्यवेक्षक परवानधारक असणे आवश्यक आहे.<br>३) तत्सम कामाचा २ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. | १ (निवडयादी) | अनुसूचित जमाती | **विद्युत विभाग** | |
| ९ | असिस्टंट ईलेक्ट्रीशियन (वर्ग-क) | रु.३५४० ते ८१३५ + मान्य भत्ते | १) इ.७ वी उत्तीर्ण<br>२) पी.डब्ल्यू.डी.वायरमन परिक्षा द्वितीय वर्गात उत्तीर्ण<br>३) तारतंत्री परवानाधारक असणे आवश्यक आहे.<br>४) तत्सम कामाचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. | १ (निवडयादी) | अनुसूचित जमाती | **विद्युत विभाग** | |
| १० | अनुरेखक (वर्ग-क) | रु.३१५० ते ७३०० + मान्य भत्ते | १) एस.एस.सी.अगर तत्सम परिक्षा उत्तीर्ण<br>२) ड्रॉईंगची इंटरमिजिएट सरकारी परिक्षा उत्तीर्ण<br>३) ट्रेसर(अनुरेखक) कामाचा २ वर्षांचा अनुभव आवश्यक | १ | भज(ड) | **नगर अभियंता कार्यालय** | |
| ११ | हेल्पर (वर्ग-ड) | रु.२७५० ते ५६९० + मान्य भत्ते | १) इयत्ता ८ वी उत्तीर्ण<br>२) मुद्रणालयाकडील सर्वसाधारण कामाचा किमान १वर्षांचा अनुभव आवश्यक. | १ | अनुसूचित जमाती | **मुद्रणालय विभाग** | |
| १२ | माळी (वर्ग-ड) | रु.२५५० ते ३२०० + मान्य भत्ते | साक्षर,<br>माळी कामाचा शासकीय कोर्स उत्तीर्ण,अनुभव असल्यास प्राधान्य. | १ | विमाप्र | **उद्यान विभाग** | |

**अटी:-**

१) **<u>वयोमर्यादा</u>** :-

**(अ)** जाहिरातीचे दिनांकास किमान वय १८ वर्षे पुर्ण असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिलक्षम राहील).

**(ब)** माजी सैनिक व अपंग यांच्यासाठी सर्वसाधारण उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

**(क)** स्वातंत्र सैनिक नामनिर्देशित पाल्य/खेळाडू यांना ५ वर्ष शिथीलक्षम व जनगणना कर्मचाऱ्यांसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील.

**(ड)** पुणे महानगरपालिकेच्या सेवेत असणाऱ्या उमेदवारास कमाल वयाची अट लागु होणार नाही.

२) अर्ज करताना उमेदवारांनी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.

**३) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.**

४) अ.क्र.१ ते ६ येथील पदासाठी दिनांक ०७/०८/२००१ व दिनांक २०/०७/२००२ व आजपर्यंतच्या सर्व शासन निर्णयान्वये DOEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O स्तर, किंवा A स्तर, किंवा B स्तर, किंवा C स्तर, किंवा MS-CIT परिक्षा नेमणूक झाल्यापासून २ वर्षात उत्तीर्ण होणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

५) निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णयानुसार नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु राहील.

६) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता-गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (ट्रु-कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. तसेच टपाल खात्याची दिरंगाई वा कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अशा अपात्र ठरलेल्या अर्जांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**७) वरील पदांवर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त होणारा उमेदवार पुणे महानगरपालिकेच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदली योग्य राहील.**

८) निवड झालेल्या मागासवर्गीय गटातील उमेदवारांना नियुक्तिपुर्वी पुणे महानगरपालिकेकडे जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र **(caste validity certificate)** सादर करणे बंधनकारक राहील.

९) रिक्त पदाच्या तुलनेत अधिक अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य ते निकष लावून मुलाखतीस बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या मर्यादित करणेसाठी पात्रता (चाळणी) परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा घेण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

१०) उमेदवार सरकारी / निमसरकारी किंवा महापालिका सेवेत असल्यास त्यांचे अर्ज त्यांचे खाते प्रमुखांमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

११) मुलाखतीस बोलाविणेत आलेल्या उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१२) मुलाखतीस बोलाविणेचे अंतिम अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

१३) अर्जदार महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१४) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी अपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्त समाप्त करण्यात येईल.

१५) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर व्ही २०००/प्र.क्र. १७/२०००/१२ दि.१/७/२००५ अन्वये वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दि.२८/३/२००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे प्रतिज्ञापन संबंधित उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१६) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, निरधिसुचित जमाती(विमुक्त जाती) भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१/ सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८ हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने द.२९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे.या अधिनियमामधील नियम क्र.४(२)(दोन) खालील परंतूकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून सर्व प्रवर्गांना लागू असेल अशी तरतूद केलेली आहे.त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे(क्रिमीलेअर)तत्व विजा(अ)भज(ब ),भज(क ),भज(ड ),विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांना लागू आहे.त्यानुसार या प्रवर्गातील उमेदवारांनी जात व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर)प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१७) रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे.त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही.परिक्षेचा प्रकार,पदांची संख्या समांतर आरक्षण याबाबत बदल करणे,परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे,अशंत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त पुणे महानगरपालिका हे स्वत:कडे राखून ठेवीत आहे.याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

**१८) बिगर मागास गटासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना रु.१००/- किमतीचे व आरक्षीत गटासाठी अर्ज करणाऱ्या मागसवर्गीय उमेदवारांना रु.५०/- किमतीचे पुणे मनपाचे छापील फॉर्म मा. महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली १) मा.उप आयुक्त क्र.१. घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय, घोलेरोड मनपा मुद्रणालया समोर, पुणे ४, २) मा.उप आयुक्त क्र.२. ढोलेपाटीलरोड क्षेत्रिय कार्यालय, ढोलेपाटील मार्केट इमारत, पुणे १. ३) मा.उप आयुक्त क्र.३. - टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय, ९९०, शुक्रवारपेठ, शिवाजीराव ढेरे उद्योग भवन टिळकरोड, पुणे ३०.,४) मा.उप आयुक्त क्र.४-टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय,९९० शुक्रवारपेठ, शिवाजीराव ढेरे उद्योग भवन टिळकरोड, पुणे ३० येथे दि. २५/०१/२०१० ते दि. ५/०२/२०१० अखेर (पर्यंत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते दु. २.०० या वेळेत विकत मिळतील व दि.६/०२/२०१० दुपारी ४.०० पर्यंत स्विकारले जातील. सदरचे फॉर्म पोस्टाने अगर व्हिपीने मनिऑर्डर रक्कम स्विकृत करुन पाठविले जाणार नाहीत.**

**सही/-**
**महेश झगडे**
**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका.**